# बालशिक्षणाची रचनावादी मानसशास्त्रीय तत्त्वे

स्टेला वॉसनिअड् (Stella Vosniadou) यांनी तयार केलेली, 'हाऊ चिल्ड्रन लर्न' या नावाची एक पुस्तिका, 'इंटरनॅशनल अॅकेडमी ऑफ एज्युकेशन' २००१ साली प्रकाशित केली.

या पुस्तिकेत, तत्पूर्वीच्या संशोधनावर आधारित अशी मानसशास्त्रीय पण व्यावहारिक तत्त्वे मांडण्यात आली आहेत. सार्वत्रिकरीत्या लागू पडतील असा विश्वासही प्रास्ताविकात व्यक्त केला आहे.

या पुस्तिकेत एकूण १२ तत्त्वे सांगितली असली तरी त्यातील पहिली तीन तत्त्वे, प्रामुख्याने बालशिक्षणाच्या क्षेत्रात उपयुक्त ठरणारी आहेत. विशेषतः शिक्षणक्रम तयार करण्यासाठी तसेच प्रत्यक्ष बालवर्गातील शिकण्याचे वातावरण तयार करण्यासाठी या तत्त्वांचा उपयोग होऊ शकेल. ही मानसशास्त्रीय व्यावहारिक तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत:

१. कृतिशील भाग (Active Involvement)

२. समाज सहभाग (Social Participation)

३. अर्थपूर्ण उपक्रम (Meaningful Activation)

पुस्तिकेत सुचविल्याप्रमाणे, या तत्त्वांच्या पायावर शिक्षकांनी, आपापल्या वर्गांतील शिकण्याचे वातावरण, तयार केले पाहिजे.

**१. कृतिशील भाग**

मुलांचे शिकणे नीट व्हायचे असेल तर मुलांनी स्वतःच्या शिकण्यात मनापासून भाग घेतला पाहिजे; आणि त्याचबरोबर मुलांनी 'करून शिकण्या'च्या (Learning by doing) पद्धतींचा अवलंब केला पाहिजे. मुले बालवर्गात आणि घरीसुद्धा अनेक प्रकारे आपल्या शिकण्यात कृतिशीलता आणू शकतील.

- वस्तू हाताळून
- समस्या सोडवून
- विचार करून
- कल्पना करून

- शोध घेऊन
- संपर्क साधून
- मोडतोड करून (निर्मिती करून)

मुलांना रस वाटेल, छोट्या छोट्या कृती करताना आव्हान वाटेल अशा तऱ्हेचे वातावरण, सतत राखता आले पाहिजे. यासाठी,

- बराच काळ मुले स्वस्थ बसून राहतील, केवळ काहीतरी ऐकत राहतील अशा घटना टाळाव्यात.
- मुलांचे हात व मन गुंतून राहील अशा प्रकारचे उपक्रम  कृती करणे, अवलोकन करणे, प्रकल्प इ.
- मुलांच्या एकत्रित उपक्रमांत सर्व मुलांना सहभागी करून घ्या; एकत्र येऊ द्या, एकत्र बोलू द्या, एकत्र कृतीशील उपक्रम करू द्या.
- छोट्या- छोट्या, जवळपासच्या अनुभव-सहली काढा.
- मुलांना निवडीच्या संधी द्या म्हणजे मग मुले निर्णय घायला शिकतील,त्यातूनच हळू-हळू शिक्षण-स्वावलंबनाकडे वळतील.
- या सर्वच गोष्टींचे अवलोकन, नोंदी व मूल्यमापन करीत राहावे लागेल.

***<u>समाज-सहभाग (Social participation</u>***

शिक्षणासाठी वैयक्तिक क्षमतांचा वापर जेवढा आवश्यक आहे तेवढाच समाज घटकांचा सहभागही आवश्यक असतो. मुलांचा समाज-संपर्क हा अगदी अल्पवयापासून म्हणजे जन्मापासूनच सुरू होतो. मुलांच्या सर्व प्रकारच्या विकासांची ती गरज असते; आणि यांत पालकांचे सहाय्य, त्यांचा दृष्टीकोण आणि त्यांचे सहाय्याचे प्रयत्न –म्हणजेच पालकांची एकूण भूमिका महत्त्वाची ठरते.लेव्ह वायागोटस्की यांनी सांगितल्याप्रमाणे, मुलांचा शिकण्याचा मार्ग हा, प्रौढांच्या वागणुकी, सवयी, त्यांचा भाषा वापर, त्यांच्या कल्पना, श्रद्धा यांच्या अवलोकनाने व आत्मसात करण्याने, घडत असतो. किंबहुना यांमुळेच, घरचे व बालवर्गांचे वातावरण अशा प्रकारे मुलांच्या स्वयंशिक्षणाला मदत करणारे असावे लागते.

मुलांना त्यांच्या स्वतःहून शिकण्यासाठी विविध प्रकारच्या समाज संपर्काच्या संधी निर्माण कराव्या लागतात. त्याचे काही मार्ग पुढीलप्रमाणे आहेत:

- एकत्र येवून, एकत्र बसून
- दुसऱ्यांची मदत घेऊन, दुसऱ्यांना मदत करून
- घरांना, संस्थांना भेटी देऊन
- मुलाखती घेऊन
- बातम्यांचे सर्वेक्षण करून
- वाचून, लिहून, भाषणे, पथनाट्ये, कथाकथन, कवितावाचन
- कार्यक्रमांना जाऊन.
- बालवर्गांमध्ये किंवा बालकांसाठी काम करणाऱ्या अन्य संस्थांमध्ये, मुलांना गटांमध्ये बसविणे, त्यांना करण्यासाठी लहान - मोठी कामे पुरविणे व त्यावर गरजेप्रमाणे देखरेख करणे आवश्यक असते.
- बालवर्गांमध्ये अश्या अनेक संधी निर्माण करता येतात की जिथे मुलांना परस्परांबरोबर खेळावे लागेल, काम करावे लागेल, वाटणी करावी लागेल, जुळवून घ्यावे लागेल.
- एक महत्त्वाची गोष्ट अशी की बालशाळांनी आपल्या विविध उपक्रमांकरवी, एकीकडे मुलांच्या घरांशी-पालकांशी जोडून घ्यायचे असते, तर दुसरीकडे बाह्य समाजाशी संबंध बांधायचे असतात.

***<u>अर्थपूर्ण उपक्रम (Meaningful Activities)</u>***

येथे 'अर्थपूर्ण' याचा अर्थ 'मुलांच्या दृष्टिकोनांतून अर्थपूर्ण' असा घ्यायचा. माणसे स्वतःला कोणत्या ना कोणत्या अर्थाने अर्थपूर्ण, सुसंगत, जीवनाला उपयोगी वाटतील अशाच गोष्टी प्रामुख्याने शिकतात. अशाप्रकारे शिकणे हे नेहमीच हेतुपूर्ण असते.

आपला आजवरचा बालशाळांबाबतचा अनुभव असा आहे की, अनेकदा प्रौढांना, संस्थाचालकांना, धोरणकर्त्यांना, शासनाला आणि प्रत्यक्ष शिक्षकांना वाटते म्हणून अनेक अशा गोष्टी मुलांवर लादल्या जातात की त्या मुलांना फारश्या आवडत नसतात आणि उपयुक्तही नसतात. कित्येकदा अशा गोष्टी मुलांच्या वयानुरूप नसतात, त्यांच्या आकलनक्षमतेशी जुळणाऱ्या नसतात, तर काहीवेळा मुलांना रमवतील, शिकायला उद्युक्त करतील, शिकण्यासाठी काही आव्हाने पुरवतील अशा नसतात. शिकण्यासाठी न कळणाऱ्या भाषेचा वापर करणे हाही असाच एक उपक्रम असतो. अशा 'सक्ती'च्या उपक्रमांतून बालशाळांनी धीटपणे बाहेर पडले पाहिजे.

शिक्षक-शिक्षिका आपल्या बालवाडीत, मुलांच्या संस्कृतीशी, सामाजिक वातावरणाशी आणि वैयक्तिक गरजांशी जुळणारे असे उपक्रम, अर्थपूर्ण उपक्रम म्हणून अंमलात  आणू शकतील, आणि आपली बालशाळा फक्त अर्थपूर्ण गोष्टींची शाळा बनवू शकतील. त्यासाठी.....

- काही 'निरर्थक' गोष्टी टाळून,
- मुलांच्या भौतिक व शैक्षणिक गरजा ओळखून,त्यांची योग्य प्रकारे पूर्ती करून
- वर्गरचनेतच आवश्यक ते बदल करून
- शिकण्याचे नवेनवे अर्थपूर्ण अनुभव देऊन
- वातावरणात समुचित बदल करून
- ज्ञानाचा वापर करण्याच्या संधी देऊन
- कला ,खेळ,  नेतृत्व-पुढाकार यांना स्थान देऊन
- मुलांना तोंडी भाषा समृद्ध करण्याच्या संधी देऊन

'इंटरनॅशनल ॲकेडमी ऑफ एज्युकेशन' या संस्थेच्या 'हाऊ चिल्ड्रन लर्न' या अहवालात या तीन मानसशास्त्रीय तत्वांविषयी अन्य नऊ तत्वे मांडली आहेत. सर्वांच्या केवळ माहितीसाठी ती येथे देत आहोत.

- नवी माहिती पुर्वाज्ञानाशी जोडणे (Relating new information to prior knowledge)
- वेगवेगळया क्लुप्त्यांचा वापर (Being strategic)
- स्वनियमन व विचार करण्यात गुंतविणे(Engaging in self-regulation and being reflective)
- पुर्वज्ञानाशी पुनर्रचना करणे (Restructuring prior knowledge)
- स्मरणापेक्षा समाजण्याचे उद्दिष्ट ठेवणे (Aiming towards understanding rather than memorization)
- ज्ञानाचे संक्रमण शिकण्यास मुलांना मदत करणे (Helping student learn to transfer)
- सरावासाठी पुरेसा वेळ देणे (Taking time to practice)
- व्यक्तिगत व विकासात्मक फरक (Developmental and individual differences)
- प्रेरित शिकणारे (अध्यात्म्क) निर्माण करणे (Creating Motivated Learners)

❖